# संशोधन करणार आहे त्या मध्ये आधी आवड निर्माण झाली पाहिजे : डॉ. एस. एन. गोलगिरे




श्रीपतराव चौगुले कॉलेजमध्ये एकदिवसीय चर्चासत्राचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.एस.एन.गोलगिरे यांचे स्वागत करताना शिवाजीराव पाटील समवेत डॉ. विजयकुमार पाटील, डॉ. बी. एन .रावण, डॉ. उषा पवार ,प्रा. पी. बी. लव्हटे, प्रा. ए. जे. शिंगे. प्रा. यु. बी.पवार व मान्यवर

संशोधन पद्धती ( Research Methodology) म्हणजे एखादी समस्या सोडवण्यासाठी किंवा नवीन ज्ञान मिळवण्यासाठी पद्धतशीरपणे माहिती संकलित करणे , तिचे विश्लेषण करणे आणि निष्कर्ष काढण्याची वैज्ञानिक प्रक्रिया होय. संशोधन हे फक्त विज्ञान पुरतेच मर्यादित नाही तर कोणत्याही विषयांमधून संशोधन करता येते.संशोधन करायचे म्हटले तर तुमच्या मनात आधी प्रश्न निर्माण झाले पाहिजे तसेच आपल्या मैत्रिणी मित्रांसोबत विचार करून प्रश्न तयार केले पाहिजे त्यावर काही संशोधन करता येते का याचा विचार केला पाहिजे आणि आपण जे काम करणार आहे , संशोधन करणार आहे त्या मध्ये आधी आवड निर्माण झाली पाहिजे. त्यावेळी आपले संशोधन हे चांगल्या प्रकारे होते असे प्रतिपादन यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय , वारणानगर येथील डॉ. एस. एन. गोलगिरे यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्टस् ॲण्ड सायन्स कॉलेज, माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व सायन्स विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रिसर्च मेथडाॅलाॅजी या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.एस.एन.गोलगिरे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार पाटील म्हणाले संशोधनातून नवीन निर्माण होत असते त्या संशोधनाचा मानवी जीवनाला उपयोग होत असतो त्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधन करणे गरजेचे आहे.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात मार्गदर्शन करताना डॉ.बी.एन.रावण म्हणाले रिसर्च हे आपल्या अभ्यासाशी संबंधित आहे फक्त आपण त्यात आवड घेऊन केले पाहिजे रिसर्च हे खूप भाषावर केले जाते तुम्ही रिसर्च छोटा का असेना पण रिसर्च करा आपल्याला काय करायचे आहे त्यावर आधी काय संशोधन झाले आहे आणि त्यानंतर आपण काय संशोधन केले पाहिजे याचा विचार केला पाहिजे.

कार्यशाळेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला पाणी घालून करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील , ज्युनिअर विभाग प्रमुख व सिनेट सदस्य डॉ. उषा पवार, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष सहसमन्वयक डॉ. एस. एस. कुरलीकर, कार्यशाळा समिती प्रमुख डॉ. यु. एन. लाड होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.यु.बी.पवार यांनी केले आभार प्रा.एच.आर.पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. पी. बी. लव्हटे यांनी केले.

कार्यक्रमास सर्व शिक्षक, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.